**महाराष्ट्र तांत्रिक सेवा, गट-ब मधील सहायक आयुक्त (तांत्रिक) या संवर्गातील पदावरील श्री. गणेश वसंत वंडकर, सहाय्यक आयुक्त (तांत्रिक) यांचा परिविक्षाधीन कालावधी पूर्ण करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन आदेश क्रमांक : सपववि-३७०१२/७/२०२६-DESKTEX-२**
१४ वा माळा, नवीन प्रशासकीय भवन,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ०२ एप्रिल, २०२६

**वाचा :-** १) स.प.व व.वि. शासन निर्णय क्रमांक:- सपववि३७०३०/२०/ २०२३/DESKTEX-२, दि. २४.०१.२०२४ व शुध्दीपत्रक दि.०१.०२.२०२४
२) सा.प्र.वि. शासन निर्णय क्र. परिवी-२७१५/प्र.क्र. ३०२/कार्या-८, दि. २२.०६.२०२१
३) सा.प्र.वि.अधिसूचना क्र.टिआरएन २०११/प्र.क्र.२८४/११/१२अ, दि. ०२.०२.२०२२
४) आयुक्त, वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर यांचे प.क्र., कार्या-१/आस्था/परिविक्षाधीन का./सहा. आयु. तां./३३६/२०२५, दि.१९.१.२०२६, दि. २२.१.२०२६, दि. ४.३.२०२६ व दि. १.४.२०२६.

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या श्री. गणेश वसंत वंडकर या उमेदवाराची वाचा येथील क्र.१ येथे नमूद दि.२४.०१.२०२४ च्या आदेशान्वये महाराष्ट्र तांत्रिक सेवा, गट-ब मधील सहायक आयुक्त (तांत्रिक) या संवर्गातील पदावर सातव्या वेतनआयोगानुसार सुधारीत वेतन मॅट्रीक्स मधील वेतनस्तर एस-१५ (रुपये ४१,८००-१,३२,३००) या वेतनश्रेणीत दोन वर्षाच्या परिवीक्षाधीन कालावधीकरीता सरळसेवेने नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार त्यांनी दि. २५.०१.२०२४ रोजी (म.पू.) त्या पदाचा कार्यभार धारण केला आहे.

२. सामान्य प्रशासन विभागाच्या वाचा क्र.२ येथे नमूद दि.२२.०६.२०२१ च्या शासन निर्णयान्वये परिविक्षा धोरणसंदर्भात सुधारीत मार्गदर्शक सूचना पारित केल्या आहेत. आयुक्त,वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर यांनी वाचा .क्र ४ येथे नमूद दि.१९.१.२०२६, दि. २२.१.२०२६, दि. ४.३.२०२६ व दि. १.४.२०२६ च्या पत्रांन्वये केलेल्या शिफारशीनुसार श्री. गणेश वसंत वंडकर यांनी सहायक आयुक्त (तांत्रिक), गट- ब पदावर पदस्थापना झाल्यापासून २ वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी समानधानकारकरित्या पूर्ण केला असल्याने त्यांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन आदेश :-**

महाराष्ट्र तांत्रिक सेवा, गट-ब मधील सहायक आयुक्त (तांत्रिक) या संवर्गातील पदावर सरळसेवेने नियुक्ती केलेल्या श्री. गणेश वसंत वंडकर यांनी सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२२.६.२०२१ च्या शासन निर्णया मधील आवश्यक असणाऱ्या बाबी समाधानकाररित्या पूर्ण केल्या आहेत. श्री.वंडकर यांचा परिविक्षाधीन कालावधी दिनांक २४.०१.२०२६ रोजी समाप्त होत असला तरी परिविक्षा कालावधी पूर्ण करण्यासाठी आवश्यक असणारे पायाभूत प्रशिक्षण दिनांक ०३.०३.२०२६ रोजी पूर्ण केले असल्याची बाब विचारात घेऊन खालील तक्त्यात रकाना क्रमांक ५ मध्ये नमूद दिनांक

०३.०३.२०२६ रोजी (म.नं.) परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्यात येत आहे. तसेच रकाना क्र. ७ मध्ये नमूद दि.०४.०३.२०२६ (म.पू.) पासून त्यांची सेवा पुढे चालू ठेवण्यास मंजूरी प्रदान करण्यात येत आहे:-

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नाव | शासन सेवेत नियुक्तीच्या आदेशाचा दिनांक | शासन सेवेत प्रथम रुजू झाल्याचा दिनांक | रकाना ४ मध्ये नमूद केलेलया दिनांकानुसार परिविक्षाधीन पूर्ण केल्याचा दिनांक | परिविक्षा कालावधीत घेतलेल्या एकूण अर्जित/ परावर्तित रजा इत्यादी एकूण कालावधी | परिविक्षा कालावधी समाधानकारक रित्या पूर्ण केल्याने शासन सेवा ज्या दिनांकापासून पुढे चालू ठेवावयाचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | श्री. गणेश वसंत वंडकर, सहायक आयुक्त (तांत्रिक) | २४.०१.२०२४ | २५.०१.२०२४ | ०३.०३.२०२६ (म.नं) | -- | ०४.०३.२०२६ (म.पू.) |

२. आयुक्त, वस्त्रोदयोग आयुक्तालय, नागपूर यांना कळविण्यात येते की, श्री. गणेश वसंत वंडकर, सहायक आयुक्त (तांत्रिक) गट-ब यांच्या पुढील वेतनवाढी नियमानुसार व विहित तरतूदीनुसार लागू करण्याच्या अनुषंगाने तात्काळ कार्यवाही करावी.

३. आयुक्त, वस्त्रोदयोग आयुक्तालय, नागपूर यांनी श्री.गणेश वंडकर आयुक्त, सहायक आयुक्त (तांत्रिक) यांच्या परिविक्षाधीन कालावधीत कोणतीही विभागीय चौकशी सुरु अथवा प्रस्तावित नसल्याबाबतची तसेच त्यांचेविरुध्द कोणतेही न्यायालयीन प्रकरण सुरु नसल्याबाबतची खातरजमा करुन त्यांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्याची नोंद सेवापुस्तकात घेण्याबाबत संबंधितांना सूचना दयाव्यात.

४. सदर आदेश वाचा क्र.२ येथे नमूद सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २२.०६.२०२१ च्या अन्वये प्रशासकीय विभाग प्रमुखास प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०४०२१६४८३६५३०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANGITA DINESH SHELKE

Digitally signed by SANGITA DINESH SHELKE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=COOPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT, 2.5.4.20=9ace0ca0b129ab4da8f9e911057d75e7fbf6f6bd0b55e8ff7ca0deacfa15e1c0, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=A16A0B4000A30DD7389BEC31D153FB1F2D63557A5E779E513EF76643F6613183, cn=SANGITA DINESH SHELKE
Date: 2026.04.02 16:50:12 +05'30'

**(संगिता शेळके)**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत**

१) आयुक्त (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर

२) महालेखापाल ,(लेखा व अनुज्ञेयता)महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर

३) जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर

४) संबंधित अधिकारी, आयुक्त, वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर यांचेमार्फत

५) निवड नस्ती टेक्स-२